क्रमांक : २८२६७ /ब
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
**दिनांक : ३ नोव्हेंबर ,२०१७**

# :: प रि प त्र क ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१७ च्या चतुर्थ (माहे डिसेंबर,२०१७ ) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र .....**

महाराष्ट्र विधानसभेचे सन २०१७ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन विधान भवन, नागपूर येथे सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी पासून सुरु होणार आहे. सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची खालील माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(१) गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री

(२) मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेमून देण्यात आलेले दिनांक.

(३) तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती QIS या संगणक प्रणालीद्वारे **ऑनलाईन** पध्दतीने स्वीकारण्याचा व प्रत्येकी २ छापील प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक.

(४) उत्तरीत होणाऱ्या प्रश्नांच्या बॅलटचा दिनांक

**तसेच असेही कळविण्यात येते की, विवरणपत्रात स्तंभ क्रमांक ५ मध्ये उत्तरीत होणाऱ्या तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या बॅलटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. बॅलटनंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/ गट बदलून देता येणे शक्य नसल्याने, त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकासच उत्तर प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नाच्या हस्तांतरणापूर्वी उत्तराकरिता निश्चित केलेल्या दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरण पत्रात दर्शविण्यात आलेल्या बॅलटच्या दिनांकापूर्वी सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

**(शिवदर्शन साठये)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(२) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी तीन प्रती)
(३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (प्रत्येकी तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.



\\Mls-b1-16\d\Rotation Order Dec 2017\Rotation December 2017\A4 Rota press 2.doc

# महाराष्ट्र विधानसभा

## चतुर्थ अधिवेशन, २०१७

### तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या बॅलटचा दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा दिनांक (४) | प्रश्नांच्या बॅलटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास आणि वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ |
| | | सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण मंत्री<br>(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ |
| | | मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ |
| | | *मंगळवार,दिनांक २६ डिसेंबर, २०१७ | *सोमवार, दिनांक १८. डिसेंबर, २०१ | *सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ |
| तीन | (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग व खनिकर्म मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ | मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ |
| | | बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ |
| | | *बुधवार, दिनांक २७ डिसेंबर, २०१७ | *सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ | *सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ |
| चार | (१) वित्त व नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री<br>(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री | गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ | बुधवार, दिनांक ६ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ |
| | | गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ | गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ |
| | | *गुरुवार, दिनांक २८ डिसेंबर, २०१७ | *मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ | *सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ |
| पाच | (१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री<br>(३) कृषी ,फलोत्पादन मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ | गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ |
| | | शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ |
| | | *शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ | *बुधवार, दिंनांक २० डिसेंबर , २०१७ | *सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ ते शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.